# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मोबाईल मेडीकल युनिट करीता जिल्हा आरोग्य सोसायटी, ठाणे पदभरती जाहीरात सन२०२३ - २४

(, https://arogya.maharashtra.gov.in www.zpthane.maharashtra.gov.in)

राष्ट्रीय आरोग्य अभियान , मोबाईल मेडीकल युनिट ठाणे अंतर्गत जिल्हा व तालुकास्तरीय रिक्त पदांच्या पदभरतीसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविलेली पदे निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात व रोजंदारी पध्दतीने मानधन तत्वावर भरणेसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. अ.क्रं १ ते अ.क्र. २ या पदांकरिता Walk in Interview - गुणांकन पध्दतीने पदभरती करण्याकरीता विहित नमुन्यात व कागदपत्रांसह परिपुर्ण अर्ज वाघळे ईस्टेट,रोड नं- २२ सर्कल,जीएसटी भवन समोर ठाणे (पश्चिम ४००६०१) येथे इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावे.

| अ क्रं | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्ती स्तर | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | मुलाखतीचे दिंनाक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | Female Medical Officer | आवश्यकते नूसार | **Remote & Triabal Area in Thane Dist.** | MBBS Priority Or Ayush Doctors | MBBS- Rs. 60000/- PER MONTH Ayush Doctors- 40000 PER MONTH | दिनांक-२० ऑगस्ट२०२४ वार - मंगळवार रोजी सकाळी १०.०० ते २.०० |
| 2 | Staff Nurse | आवश्यकते नूसार | **Remote & Triabal Area in Thane Dist.** | GNM/B.Sc Nursing | Rs. 18000/- PER MONTH | दिनांक-२१ ऑगस्ट२०२४ वार - बुधवार रोजी सकाळी १०.०० ते २.०० |

अटी व शर्ती:-

१) **इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (Is Applicable) ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) जात / वैधता प्रमाणपत्र इ.छायांकित प्रतींसह वाघळे ईस्टेट,रोड नं- २२ सर्कल,जीएसटी भवन समोर ठाणे (पश्चिम ४००६०१) येथे कामकाजाच्या दिवशी वरील तक्त्यात दर्शविलेल्या दिवशी स्वतः उपस्थित राहुन अर्ज जमा करावेत.**

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील.राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत **वैद्किय अधिकारी (MBBS), अतिविशेषज्ञ** वयोमर्यादा एमबीबीएस व स्पेशालिस्ट यांच्यासाठी ७० वर्ष असेल तसेच वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हाशल्य चिकित्सक यांचेकडुन प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

४) लहान कुटुंबाची अट दि.२३/०७/२०२० पासून लागु करण्यात आली असून त्यानुसार दि.२३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

५) वरील नमुद पदे ही रोजंदारी स्वरुपाची असल्यामुळे सदरील पदावर निवड झालेल्या उमेदवांराना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हक्क व सेवा सांगता येणार नाही. सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

७) केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द् कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

९) वैद्यकीय अधिकारी & Staff Nurse पदांकरीता तत्सम कौन्सिलकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र र्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. कौन्सिल कडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागद पत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापी वैध्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१०) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस गुणानुक्रमे मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियमानुसार नियुक्ती आदेश दिले जातील.सदर निवड यादी ही तयार झालेनंतर पुढील ११ महिन्यापर्यंत वैध राहील.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर ,पत्ता व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१३) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१४) उमेदवारास एका पेक्षा जास्त पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास वेगवेगळे अर्ज सादर करावे लागतील तसेच वेगवेगळे डिमांड ड्राफट् सादर करणे अनिवार्य राहील.

१५)सोबत अर्जाचा नमुना हा https://forms.gle/S24D8bvg3YrXZJ3o7 प्रसिध्द करण्यात येत आहे.

**१६) सदरहू भरती प्रक्रियेकरीता वरील तक्त्यात दर्शविलेल्या दिवशी अर्ज दि. / /२०२४ अखेर राहणार असुन तदनंतर छाननी, लेखी परिक्षा /मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व तथा निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडिल प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी www.aarogya.maharashtra.gov.in & https://www.zpthane.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यात येऊ नये.तसेच उमेदवारास एसएमएस (SMS) इमेल (E-mail)दुरध्वनिदवारे कळविण्यात येणार नाही. उमेदवारांनी वेळोवेळी वरिल संकेत स्थळांवरुन नोद घ्यावी.**

**१८) केवळ शासकीय,निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.खाजगी, स्वयंसेवी संस्था,बाहय यंत्रणाद्वारे कार्यरत पदावर कामाचा अनुभवाचा विचार करणेत येणार नाही.समकक्ष कामाचा अनुभव ग्राहय धरणेत येईल.तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करताना संस्थेचे लेटर हेड, जावक क्र व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. फक्त नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.**

१९) नियुक्ती आदेश देयापूर्वी व नियुक्ती आदेश दिल्यानंतर सर्व मूळ आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे याची तपासणी व खात्री करण्यात येईलृ कागदपत्राची पुर्तता न केलेस कोणत्याही उमेदवाराचा अर्ज कोणत्याही स्तरावर बाद करणेत येईल व गुणाकनामध्ये ही बदल करणेत येईल.

२०) उमेदवाराचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२२) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील.

२३) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार देण्यात येईल. याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करणेत येईल. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल. उपरोक्त पदे भरेपर्यंत दर बुधवारी अर्ज स्विकारण्यात येतील.

२४) भरती प्रक्रियेत पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी राखुन ठेवलेले आहेत.

२५) वैदयकिय अधिकारी (MBBS) व आयुष या पदांकरिता सदर भरतीप्रकियेत उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या दर मंगळवारी थेट मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया करण्यात येईल. तसेच सदर दिवशी शासकिय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी थेट मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया करण्यात येईल.

२६) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**२७) निवड प्रक्रिया**

पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| **विवरण** | **तपशील** | **अधिकतम गुण** |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे प्रॅप्रोशन काढावे. (उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Propotion =60*50/100=30 | ५० गुण |
| पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण दयावेत. (उदा.एमबीबीएस पदासाठी MD/MS उमेदवाराने अर्ज केला असल्सास त्यास २० गुण दिले जातील.) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव (किमान अनुभव ०६ महिने) | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण दयावेत . (१ वर्षाकरीता ६ गुण,जास्तीत जास्त ३० गुण). | ३० गुण |

स्वाक्षरी/-
सदस्य,निवड समिती
तथा
जिल्हा कार्यक्रम,व्यवस्थापक
राष्ट्रीय आरोग्य अभियान ठाणे

स्वाक्षरी/-
सदस्य,निवड समिती
तथा
माता बालसंगोपण अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

स्वाक्षरी/-
सदस्य, सचिव निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद ठाणे

स्वाक्षरी/-
अध्यक्ष, निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद ठाणे